बिना सहकार नही उध्दार !

# Archana Nagar Co.Op. Hsg. Society Ltd.

39/2/2, Erandwane, Pune - 411038.
Reg. No. P.N.A./H.S.G./(T.C.)/1707/1989-90 Dt. 27/10/1989
Email : archananagar.chs @gmail.com

Ref. No. 2024-25/36 Date : 24.2.25

**विषय : संस्थेच्या पुनर्विकासाबाबत विकसकाच्या निवडीचा अंतिम निर्णय घेण्याचे दृष्टीने संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेची पूर्वसूचना**

दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी संस्थेच्या विषय सर्वसाधारण सभेत ठरल्यानुसार संस्थेच्या पुनर्विकासाचे कामासाठी विकसकाची निवड अंतिम करण्याच्या दृष्टीने दिनांक २३ मार्च २०२५ रोजी संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात येत आहे.

**सभेचे स्थळ :** दादासाहेब दरोडे सभागृह, आगरकर रोड, बीएमसीसी जवळ, शिवाजीनगर, पुणे 411004

**सभेची वेळ :** सकाळी 9.00 am ते संध्याकाळी 6.00 pm

संस्थेच्या पुनर्विकासासाठी कार्यकारणी समिती व पुनर्विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आत्तापर्यंत करण्यात आलेली कार्यवाही दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ सभेत सर्व सभासदांना अवगत करण्यात आली आहे. शॉर्टलिस्ट केलेल्या दोन विकसकांच्या प्रकल्पांना दिनांक ९ व १६ मार्च २०२५ रोजी संस्थेच्या सभासदांना भेटी देण्याचे नियोजन आहे.

या शॉर्टलिस्ट केलेल्या विकासकांपैकी एका विकसकाची निवड अंतिम करण्याच्या दृष्टीने विकसकांना त्यांचे सादरीकरण दिनांक २३ मार्च २०२५ रोजी संस्थेतील सर्व सदस्यांसमोर करावयाचे आहे. सादरीकरणानंतर प्रश्नोत्तरांसाठी पुरेसा अवधी देण्यात येईल. त्यानंतर गुप्त मतदान पद्धतीने मतदान आयोजित करण्यात येईल व मतमोजणी त्याच वेळी करून विकसकाच्या अंतिम निवडीचा निकाल घोषित केला जाईल. ही सर्व प्रक्रिया शासकीय अधिकारी यांचे समक्ष पीएमसी यांचे समन्वयाने पार पाडण्यात येईल.

या विशेष सर्वसाधारण सभेसाठी संस्थेतील प्रत्येक निवासी/व्यावसायिक गाळ्या मागे दोन व्यक्तींना बैठकीस उपस्थित राहता येईल. त्यापैकी एक संस्थेचा सदस्य / सह सदस्य / सहयोगी सदस्य असणे बंधनकारक आहे. प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेमध्ये सदस्य असलेल्या व्यक्तीलाच सहभाग नोंदवता येईल.

दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत सभासदांनी विनंती केल्यानुसार अर्चना नगर ते बैठकीचे ठिकाण दादासाहेब दरोडे सभागृह येथे सदस्यांच्या वाहतुकीचे नियोजन करण्यात येत आहे.

सदर बैठक संपूर्ण दिवस चालणार असल्यामुळे चहा नाश्ता जेवण याची सर्व व्यवस्था बैठकीचे ठिकाणी करण्यात येईल. बैठकीस उपस्थित राहणाऱ्या सदस्या व्यतिरिक्त कुटुंबातील इतरांना सुद्धा बैठकीचे अवलोकन करता यावे यासाठी युट्युब स्ट्रीमिंग करण्याचे नियोजन आहे. बैठकीच्या सविस्तर तपशील लवकरच आपणास कळविण्यात येईल.

संस्थेच्या पुनर्विकासाबाबत अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वाची असून त्यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे, त्याकरिता आपणास सदर तारीख राखून ठेवण्याबाबत या पूर्वसूचनेद्वारे आपणास कळविण्यात येत आहे.

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित

सचिव

(शिक्का: अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित, रजि. नं. पीएनए/एचएसजी/टी सी/१७०७ १९८९-९०, पुणे-४११०३८)

www.archananagarchs.co.in